महाराष्ट्र शासन

# माझ्याविषयी जाणून घ्या...

## बिबट्या

**Common Leopard** *Panthera pardus*

वन्यप्राण्यांची हत्या करणे, जखमी करणे, बाळगणे, त्यांची अंडी व पिल्ले पळविणे
हा वन्यजीव (संरक्षण) कायदा १९७२ अन्वये गुन्हा आहे.
या बाबतीत गुन्हा घडल्यास आरोपीस रु. २५,०००/- दंड व ७ वर्ष शिक्षेची तरतुद आहे.

### बिबट्याचे जीवशास्त्र

- बिबट्या शक्यतो आपणहून माणसांवर हल्ला करीत नाही.
- साधारणत: तो मानवापासून दूर व लपून राहण्याचा प्रयत्न करतो.
- बिबट्याचा स्वत:चा प्रदेश निश्चित व परिचीत असतो.
- दाट जंगल, खुरटी जंगलप्रदेश तसेच मानवी वस्तीच्या जवळपास योग्य अधिवास मिळाल्यास त्याठिकाणी आढळून येतो.
- नवीन अभ्यासानुसार याचा वावर उसाच्या शेतांमध्ये वाढला आहे.
- बिबट्या शक्यतो रात्रीच्या वेळी शिकार करतो.

### बिबट्याचे खाद्य

- उपलब्ध खाद्य व त्याला आवश्यक अधिवास मिळाला, तर बिबट्या गावाजवळ राहू शकतो.
- पाळीव कुत्रे, शेळ्या अथवा डुकरे बिबट्याला मानवी वस्तीकडे आकर्षित करतात.
- स्वत:चे नुकसान कमी करण्यासाठी आपल्या पाळीव जनावरांना बंदिस्त गोठ्यामध्ये ठेवा.
- आपल्या परिसरातील वन्यप्राण्यांचे रक्षण करा, कारण यातील वन्यप्राणी त्याचे खाद्य आहे.

### बिबट प्रवण क्षेत्रात सावधानतेने कसे वागावे ?

- बिबट्या दिसल्यास त्याच्या जवळ जाण्याचा प्रयत्न करु नका, त्याचा पाठलाग करु नका.
- मुख्यत्वे अंधाराच्या वेळी बिबट्याचा वावर असल्यामुळे मुलांना एकटे सोडू नका.
- अंधारात एकटे फिरताना, परसाकडे जाताना, गाणी म्हणा वा बरोबर मोबाईल लावून जा.
- मुलांना शाळेमध्ये समुहाने अथवा पालकांसोबतच पाठवावे.
- रात्री गटागटाने, सोबत काठी व बॅटरी घेऊनच फिरावे.

### गावाजवळ बिबट्याचा वावर कमी करण्यासाठी घ्यायची काळजी

- गाव स्वच्छ ठेवल्यास कचऱ्यामुळे येणाऱ्या मोकाट कुत्रे व डुकरांची संख्या कमी होईल.
- सापळे लावण्यापासून लोकांना परावृत्त करा कारण सापळ्यात अडकलेला जखमी बिबट्या शिकार करु शकत नसल्याने धोकादायक बनू शकतो.
- मानवी वस्तीमध्ये बिबट्या आल्यास उत्साहापोटी पाहण्यासाठी व फोटो काढण्यासाठी गर्दी करु नका, संबंधीत वन खात्याला, वन कर्मचाऱ्यांना कळवा व त्यांना सहकार्य करा.



**तुम्ही मला जगवा... मी तुम्हाला जगवेन!**





बिबट्या हा मांजर कुळातील प्राणी आहे.

WILDLIFE CONSERVATION SOCIETY

the doodle factory

The Rufford Foundation
www.rufford.org




बिबट्याच्या स्वतःच्या प्रदेशाचे क्षेत्र हे तेथे उपलब्ध असलेल्या खाद्याच्या संसाधनावर अवलंबुन असते.

WILDLIFE CONSERVATION SOCIETY

the doodle factory

The Rufford Foundation www.rufford.org



बिबट्या हा निशाचर प्राणी आहे, तो दिवसभर आराम करतो आणि रात्री शिकारीस बाहेर पडतो.





बिबट्या हा परिस्थितीशी जुळवुन घेणारा प्राणी आहे.
तो जंगलात आणि मानवीय वस्तीच्या खुप जवळ राहु शकतो.

WILDLIFE CONSERVATION SOCIETY

the doodle factory


The Rufford Foundation
www.rufford.org



बिबट्याची पिल्ले मादी सोबत २२ महिन्यांपर्यंत राहतात.




बिबट्या हा त्याच्या नैसर्गिक अधिवासात
कमीत कमी १२ वर्षे जगु शकतो.


महाराष्ट्र शासन
सामाजिक वनीकरण, वन विभाग, जालना
स्व. उत्तमराव पाटील जैवविविधता उद्यान, FGTS, जालना
बिबट्याविषय
Image courtesy: Aditya Singh
बिबट्याचे जीवशास्त्र
• बिबट्या मानवाला घाबरतो आणि साधारणत: मानवापासून दूर राहण्याचा प्रयत्न करतो.
• बिबट्याला स्वत:चा प्रदेश परिचयाचा असतो.
• एका परिसरातून बिबट्याला पकडल्यास, दुसरा तरुण बिबट्या त्याची जागा घेऊ शकतो. अशी नवीन जागा त्याच्या परिचयाची नसल्यामुळे संघर्ष वाढू शकतो.
• बिबट्याला पकडून दूर सोडले तरी तो मूळ स्थानाकडे येण्याचा
करतो आणि अशा प्रयत्नात संघर्ष वाढू शकतो.
ट प्रवण क्षेत्रात सावधानतेने कसे वागावे ?
• दिसल्यास त्याच्या जवळ जाऊ नका, मागे फिरा, आणि कधीही त्याचा पाठलाग करू नका.
• मुलांना एकटे सोडू नका.
• फिरताना, परसाकडे जाताना, गाणी म्हणा
वरोबर मोबाईल लावून जा.
बिबट्याचे खाद्य
• पुरेसे खाद्य व राहण्या-योग्य वातावरण मिळाले, तर बिबट्या गावाजवळ राहू शकतो.
• पाळीव कुत्रे, बकऱ्या व डुकरे बिबट्याला वस्तीकडे आकर्षित करतात.
• स्वत:चे नुकसान कमी करण्यासाठी आपल्या गुरांना बंदिस्त गोठ्यामध्ये ठेवा.
• वन्य प्राणीसुध्दा बिबट्याचे भक्ष्य आहेत, त्यांचे रक्षण
गावाजवळ बिबट्याचा वावर कमी करण्यासाठी घ्यायची काळजी
• गाव स्वच्छ ठेवल्यास कचऱ्यामुळे येणाऱ्या मोकाट कुत्रे
डुकरांची संख्या कमी होईल.
• सापळे लावण्यापासून लोकांना परावृत्त करा कारण सापळ्यात अडकलेला जखमी बिबट्या शिकार करू शकत नसल्याने धोकादायक बनू शकतो.



बिबट्याची पिल्ले मादी सोबत २२ महिन्यांपर्यंत राहतात.



**इतर रानटी प्राण्यांसारखा बिबट्या सुद्धा माणसांना अतिशय घाबरतात.**

WILDLIFE CONSERVATION SOCIETY

the doodle factory

The Rufford Foundation
www.rufford.org



उंदिर, पक्षी, सरपटणारे प्राणी, डुकरे आणि
कुत्रे हे बिबट्याचे खाद्य आहे.



# प्रत्येक बिबट्याला पोकळ ठिपक्यांची विशिष्ट रचना असते.

# खबरदारी घ्या !!!



- रात्रीच्या वेळी एकट्याने बाहेर पडणे टाळा. बिबट्या रात्रीच्या वेळी जास्त सक्रिय असतो.
- पाळीव प्राण्यांना बंदिस्त आणि सुरक्षित जागी ठेवा.
- रात्रीच्या वेळी दरवाजे व्यवस्थितरीत्या लॉक लाऊन बंद करा तसेच अंगणात किंवा घराच्या बाहेर उघड्यावर झोपणे टाळा.
- रात्रीच्या वेळी लहान मुलांना आणि वृध्दांना एकटे सोडू नका.
- रात्री एकटे पायी फिरताना जवळ टॉर्च व काठी बाळगा. मोठ्याने म्युझिक लावा.
- घरापासून थोडे लांब सुरक्षित अंतरावर पीक लावा. घराजवळ रात्रीच्या वेळी मोठे लाईट लावा. घराच्या आसपास झाडे-झुडपे असल्यास तो परिसर स्वच्छ ठेवा.
- घरातल्या कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करा. न केल्यास भटक्या कुत्र्यांची संख्या वाढते आणि बिबट्या त्यांकडे आकर्षित होतो.
- अचानक बिबटट्या जवळ दिसल्यास शांत राहण्याचा प्रयत्न करा. बिबट्याला त्याच्या मार्गाने जाऊ द्या. त्याला डिवचण्याचा प्रयत्न बिलकुल करू नका. आणि तात्काळ वनविभागाला कळवा.



टॉर्चचा वापर करा



रात्रीच्या वेळी आवाजाचा वापर करा



रात्री फिरताना हातात काठी जवळ ठेवा



रात्रीच्या वेळी लहान मुले व वृद्धांना एकटे सोडू नका



पाळीव प्राण्यांना बंदिस्थ गोठा करावा



रात्री अंगनात अथवा शेतात झोपू नका

काही संशयास्पद आढळल्यास त्वरीत

## वन विभाग

यांचे 1926 ला संपर्क करावा.



# खबरदारी घ्या !!!

रात्रीच्या वेळी एकट्याने बाहेर पडणे टाळा. बिबट्या रात्रीच्या वेळी जास्त सक्रिय असतो.

पाळीव प्राण्यांना बंदिस्त आणि सुरक्षित जागी ठेवा.

रात्री एकटे पायी फिरताना जवळ टॉर्च आणि काठी बाळगा. मोठ्याने म्युझिक लावा.

रात्रीच्या वेळी लहान मुलांना आणि वृद्धांना एकटे सोडू नका.

घरातल्या कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करा. न केल्यास भटक्या कुत्र्यांची संख्या वाढते आणि बिबट्या त्यांकडे आकर्षित होतो.

FOUNDATION

अचानक बिबट्या जवळ दिसल्यास शांत राहण्याचा प्रयत्न करा. बिबट्याला त्याच्या मार्गाने जाऊ द्या. त्याला डिवचण्याचा प्रयत्न बिलकुल करू नका. आणि तात्काळ वनविभागाला कळवा.